**सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेअंतर्गत रु.२०.०० कोटी <u>इतका निधी वितरीत करण्याबाबत.</u>**

**महाराष्ट्र शासन**
**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : पूरक-२०२५/प्र.क्र.३२५/११ ए (ई-१४०३००१)**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
दिनांक : २० मार्च, २०२६.

**संदर्भ :-**

१) कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्र. शेअवि-२०२०/प्र.क्र.३३०/११-अे, दि.१९.०४.२०२३.
२) कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्र. गोमुंअ-२०२५/प्र.क्र.१४१/११-अे, दि.०९.०६.२०२५
३) कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्र. गोमुंअ-२०२५/प्र.क्र.१४१/११-अे, दि.२४.०९.२०२५
४) कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्र. गोमुंअ-२०२५/प्र.क्र.१४१/११-अे, दि.१९.१२.२०२५
५) कृषि आयुक्तालयाचे पत्र क्र. गोमुंशेसायो २०२५-२६/का.सां-९/न.क्र.४०/ निधी.मागणी/ ७५ R/२०२६, दि. ११.०२.२०२६.

**<u>प्रस्तावना :-</u>**

संदर्भ क्र.(१) येथील शासन निर्णयाव्दारे गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेमध्ये सुधारणा करण्यात आली असून, सन २०२३-२४ पासून “गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना” राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे. गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सानुग्रह अनुदान” या योजनेसाठी सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरिता एकूण रु. १४०.०० कोटी इतकी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली आहे.

सदर योजनेंतर्गत संदर्भ क्र. (२), (३) व (४) येथील शासन निर्णयान्वये अनुक्रमे रु.६०.३५ कोटी, रु.२७.८४ कोटी व रु.३१.८१ कोटी असे एकूण रु.१२०.०० कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. आता कृषि आयुक्तालयाच्या संदर्भ क्र. (५) येथील पत्राव्दारे प्राप्त झालेल्या प्रस्तावास अनुसरुन सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात माहे ऑक्टोबर, २०२५ ते माहे डिसेंबर, २०२५ या कालावधीत सदर योजनेंतर्गत मंजूर करण्यात आलेले एकूण १०१९ (९८० मृत्यू + ३९ अपंगत्व) इतके दावे निकाली काढण्यासाठी रु २०.००.कोटी इतका निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

"गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेअंतर्गत" सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात दि.०१/१०/२०२५ ते दि.३१/१२/२०२५ या कालावधीतील तालुकास्तरीय समितीने मंजुरी दिलेले एकूण १०१९ (९८० मृत्यू + ३९ अपंगत्व) इतके दावे निकालात काढण्यासाठी, रु.२०.०० कोटी इतका निधी, आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे यांना वितरीत करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. प्रस्तुत खर्च खालील लेखाशिर्षाखाली सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरिता मंजूर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पीय तरतूदीतून भागविण्यात यावा : -

**मागणी क्र. डी - ३**
**२४०१ पीक संवर्धन**
**(००) (०६) गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना (कार्यक्रम)**
**(२४०१ ४४२७) राज्य योजना - ३३ अर्थसहाय्य.**

३. सदर शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात येणारा निधी संदर्भ क्र. (१) च्या शासन निर्णयाव्दारे विहित करण्यात आलेल्या तरतूदीनुसार खर्च करण्याची जबाबदारी आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे यांची राहील.

४. या शासन निर्णयाव्दारे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या निधीच्या विनियोगाबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे शासनास सादर करतील.

५. प्रस्तुत योजनेच्या प्रयोजनार्थ, खालीलप्रमाणे "आहरण व संवितरण अधिकारी" व "नियंत्रक अधिकारी" घोषित करण्यात आले आहेत :-

| अ.क्र. | स्तर | आहरण व संवितरण अधिकारी | नियंत्रक अधिकारी |
|---|---|---|---|
| १ | आयुक्तालय | सहाय्यक संचालक (लेखा-१) | आयुक्त (कृषि) |
| २ | जिल्हा | लेखाधिकारी | जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी |
| ३ | तालुका | तालुका कृषि अधिकारी | तालुका कृषि अधिकारी |

६. हा शासन निर्णय, वित्त विभाग अनौपचारिक संदर्भ क्रमांक १२४/२०२६/व्यय-१, दि. १३.०३.२०२६ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

७. प्रस्तुत शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेताक २०२६०३२०१८१७३६६८०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

PRATIBHA MADHAV PATIL

Digitally signed by PRATIBHA MADHAV PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=AGRICULTURE AND ADF DEPARTMENT, 2.5.4.20=b693d975fffc642fe6b87c2ce9e1297fd1e8bda9b459f85f75f159984ba680fd, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=DA026E85AE8CB84E3C2ACDBECBBF2F6D6C80AE6ED5C1E54483490119EE0456AD, cn=PRATIBHA MADHAV PATIL
Date: 2026.03.20 18:18:50 +05'30'

**( प्रतिभा पाटील )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव

३. मा. उप मुख्यमंत्री (नगरविकास व गृहनिर्माण) यांचे सचिव
४. मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक विकास व औकाफ) यांचे सचिव
५. मा. मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव/ विशेष कार्य अधिकारी
६. मा.मंत्री (सर्व), यांचे खाजगी सचिव/ विशेष कार्य अधिकारी
७. मा. राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव/ विशेष कार्य अधिकारी
८. मा. राज्यमंत्री (सर्व), यांचे खाजगी सचिव/ विशेष कार्य अधिकारी
९. मा. विधिमंडळ सदस्य (सर्व)
१०. मुख्य सचिव यांचे सह सचिव,मंत्रालय, मुंबई
११. अपर मुख्य सचिव (कृषि) यांचे स्वीय सहायक, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. प्रधान सचिव (वित्त) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
१३. सचिव (नियोजन) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
१४. विभागीय महसूल आयुक्त (कोकण, नाशिक, पुणे, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, नागपूर)
१५. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
१६. जिल्हाधिकारी (सर्व)
१७. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, (लेखापरीक्षा), मुंबई/नागपूर
१८. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, ( लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर
१९. उपसचिव (२ अे), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
२०. कृषि संचालक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे (सर्व)
२१. विभागीय कृषि सहसंचालक (सर्व)
२२. जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी (सर्व)
२३. जिल्हा कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
२४. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
२५. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
२६. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
२७. मुख्य सांख्यिक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
२८. सहाय्यक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
२९. तहसीलदार (सर्व)
३०. उप विभागीय कृषि अधिकारी (सर्व)
३१. सर्व तालुका कृषि अधिकारी (सर्व)
३२. निवडनस्ती, कार्यासन ११-अे.